**MHSO130008852022**

## निशाणी ०१ वरील आदेश

१. प्रस्तूत अर्ज अर्जदारांनी **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७** च्या तरतुदीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचा अर्ज थोडक्यात खालीलप्रमाणे.

अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत प्रमोद विश्वास काटमोरे यांचे वारस असून ते दिनांक ०९/१०/२०२२ रोजी पिंपरी (पा), ता. बार्शी येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र. २ व ३ ही मयताच्या मुली व अर्जदार क्र. ४ ही मयताची आई असल्यामुळे त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. १ ते ४ हे त्यांचे वारस आहेत. अर्जदारांना शासकीय कामकाजासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज दाखल करुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

३. अर्जदारांशिवाय मयतास अन्य कोणी वारस आहेत काय या संदर्भात *'दैनिक तरुण भारत'* निशानी क्र. ७ वर प्रसिध्द करण्यात आले आहे. मयताचे मूळ मृत्यू प्रमाणपत्र नि.क्र. १४ खाली तसेच अर्जदार क्र.१ याचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. ८ दाखल केलेले आहे.

४. *'दैनिक तरुण भारत'* हे मुळ वृतपत्र दाखल केलेले असून, त्यामध्ये जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले असून त्याव्दारे मयतास अर्जदारांशिवाय अन्य कोणी वारस असतील तर त्यांनी त्यांच्या हरकती कळविण्याबाबत प्रसिध्द करण्यात आलेले आहे. तसेच जाहिरनामा नि.क्र. ७ अन्वये प्रसिध्द करुन त्याद्वारे देखील कोणाचा आक्षेप असल्यास आक्षेप नोंदविण्याबाबत जाहिर करण्यात आले आहे. तथापि जाहीर प्रगटन व जाहिरनामा प्रसिध्द करून देखील आजतागयत कोणीही अर्जदारांच्या कथनास हरकती घेतलेल्या नाहीत व त्यांचा हक्क सांगितलेला नाही.

५. अर्जदारांनी त्याचा तोंडी पुरावा आणि कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. अर्जदारांच्या तोंडी व लेखी पुराव्याला कोणीही आक्षेप किंवा उजर घेतलेला नाही. तसेच अर्जदारांचा उलटतपासही कोणीही घेतलेला नाही. म्हणुन अर्जदारांचा पुरावा विना आव्हानीत राहिला. परिणामी अर्जदारांच्या पुराव्यावर अविश्वास

दाखवण्याचे कोणतेही कारण नाही. त्यामुळे मयतास अर्जदारांशिवाय अन्य कोणीही वारस नाही असे स्पष्ट होते.

६. अर्जदारांना कार्यालयीन कामकाजासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जामध्ये नमुद केलेले आहे. अर्जदारांना चल किंवा अचल मालमत्तेच्या फेरफारासाठी वारसाप्रमाणपत्राची आवश्यकता असल्यास अर्जदारांनी ती मालमत्ता अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक होते. तसेच अर्जात नमुद केलेल्या मालमत्तेच्या मुल्यांकनानुसार कोर्ट फिस देणे आवश्यक होते. परंतु अर्जदारांनी अर्जामध्ये कोणत्याही चल किंवा अचल मालमत्तेचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे दिले जाणारे वारस प्रमाणपत्र अर्जदारांच्या चल किंवा अचल मालमत्तेच्या उद्देशासाठी वापरता येणार नाही.

७. वरील कारणीमीमांसेच्या अनुषंगाने खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यांत येतो व *अर्जदार क्र. १) सुलभा प्रमोद काटमोरे, २) प्रतिक्षा प्रमोद काटमोरे, ३) अपेक्षा प्रमोद काटमोरे व ४) कंपनाबाई विश्वास काटमोरे* हे मयत *प्रमोद विश्वास काटमोरे* यांचे बॉम्बे रेग्युलेशन कायद्याप्रमाणे कायदेशीर वारस असल्या बाबत औपचारीक मान्यता देण्यांत येते.

२. अर्जदार क्र. *क्र. १) सुलभा प्रमोद काटमोरे, २) प्रतिक्षा प्रमोद काटमोरे, ३) अपेक्षा प्रमोद काटमोरे व ४) कंपनाबाई विश्वास काटमोरे हे मयत प्रमोद विश्वास काटमोरे* हे मयत *प्रमोद विश्वास काटमोरे* यांचे वारस असल्या संदर्भात बॉम्बे रेग्युलेशन कायद्याप्रमाणे वारसा प्रमाणपत्र त्यांच्या हक्कामध्ये देण्यांत यावे.

३. अर्जदारांनी योग्य ती कोर्ट फिस भरावी.

(आदेश खुल्या न्यायालयात सांगून घोषीत)

Digitally signed by JAHANGIR RASHEED PATHAN
Date: 2023.03.06 12:03:16 +0530

( जे.आर.पठाण )

दिनांक : ०४/०३/२०२३ ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.V. Kokate (Grade III) |
| Court name | : | J.R. Pathan 3rd Jt. CJJD & JMFC, Barshi. |
| Date | : | 04/03/2023 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 04/03/2023 |
| Order uploaded on | : | 06/03/2023 |